# शिक्षक दिन कार्यक्रम अहवाल

एस. एन. मोर कला व वाणिज्य व श्रीमती गोदावरी देवी सराफ विज्ञान महाविद्यालय, तुमसर येथे दिनांक ०९ सप्टेंबर २०२५ रोज मंगळवार ला महाविद्यालयातील कला शाखेच्या वतीने "शिक्षक दिन" मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. राधेश्याम दिपटे सर तर प्रमुख अतिथी म्हणून कला शाखेचे प्रभारी डॉ. जयंतकुमार एम. मस्के व इंग्रजी विभागाचे डॉ. गोल्डी बगमार सर प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख अतिथींनी शिक्षक दिवसाचे महत्त्व अधोरेखित करत भाषण केले. त्यांनी शिक्षकाच्या योगदानाबद्दल विद्यार्थ्यांना जागरूक राहण्याचे आव्हान केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष कार्यकारी प्राचार्य डॉ. राधेश्याम दिपटे सर म्हणाले की, "गुरु हा विद्यार्थ्यांना घडवण्याचे, त्यांना सक्षम करण्याचे काम करतो. जीवनाला दिशा देण्यात आणि आपली जडणघडण करण्यात गुरुचा वाटा खूप मोठा असतो. त्यामुळे शिक्षक दिनाला भारतीय संस्कृतीत अधिक महत्त्व आहे."

या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. रेणुकादास उबाळे यांनी केले तर संचालन बी.ए. अंतिम वर्षाचा विद्यार्थी राज ठवकर यांनी केले. या कार्यक्रमात कला शाखेतील प्राध्यापक डॉ. राजेश दिपटे, प्रा. अरुण चव्हाण, प्रा. अमोल खांडवे, डॉ. राजेंद्र बेलोकार, डॉ. सचिन वेरुळकर, डॉ. अरुणा बावनकर, डॉ. सुनिता राठोड, डॉ. स्नेहल नासरे, डॉ. रितूबाई तुरकर, प्रा. जनार्दन मेश्राम, प्रा. संदीप भेंडेकर व कला शाखेतील १५० पेक्षा अधिक विद्यार्थी उपस्थित होते.



























डॉ. जयंतकुमार एम. मस्के

कला शाखा प्रभारी